दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २७५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.३० डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# थर्टी फर्स्ट यंदाही घरातच ; राज्य सरकारची नियमावली जाहीर



**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यासह संपूर्ण देशभरात आता ओमायक्रॉनच्या वाढत्या संकटामुळे चिंता निर्माण झाली आहे. कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे सरकारला पुन्हा निर्बंध लागू करावे लागत आहेत. महाराष्ट्रातही रुग्णवाढीचा दर वाढल्यानं सरकारनं खबरदारीच्या पार्श्वभूमीवर थर्टी फर्स्ट आणि नववर्ष स्वागताच्या सेलिब्रेशनसाठीची नियमावली जाहीर केली आहे. कोरोना संक्रमणाची परिस्थिती लक्षात घेता ३१ डिसेंबर २०२१ आणि १ जानेवारी २०२२ रोजी नववर्ष स्वागताच्या निमित्ताने नागरिकांनी घराबाहेर न पडता नववर्षाचे स्वागत शक्यतो घरीच साधेपणाने साजरे करावे, असं आवाहन राज्य सरकारनं केलं आहे. यासंदर्भातील एक परिपत्रकच जारी करण्यात आलं आहे.

राज्यात २५ डिसेंबरपासून रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत ५ पेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यावर बंदी घालण्यात आली आहे. आदेशांच काटेकोरपणे पालन करण्यात यावे आणि उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असंही राज्य सरकारकडून व्यक्त करण्यात आलं आहे.

### नववर्ष स्वागताच्या कार्यक्रमासाठी नियमावली

१. नागरिकांनी घराबाहेर न पडता घरातच साधेपणानं नववर्ष स्वागताचं सेलिब्रेशन करावं.

२. २५ डिसेंबर २०२१ पासून राज्यात रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत पाच पेक्षा अधिक जणांना एकत्र जमण्यावर बंदी

३. ३१ डिसेंबर रोजी नववर्ष स्वागतासाठी आयोजित कार्यक्रमांसाठी बंदिस्त सभागृहात एकूण क्षमतेच्या ५० टक्क्यांपर्यंत तर खुल्या जागेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना उपलब्ध क्षमतेच्या २५ टक्क्यांच्या मर्यादेत उपस्थित राहण्यास परवानगी असणार आहे.

४. कार्यक्रमाच्या ठिकाणी गर्दी होणार नाही, सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांचं पालन केलं जाईल, मास्क आणि सॅनिटायझरचा वापर केला जाईल याकडे विशेष लक्ष द्यावं लागणार आहे.

५. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ६० वर्षांवरील नागिरकांनी व दहा वर्षांखालील मुलांनी सुरक्षिततेच्या व आरोग्याच्या दृष्टीने शक्यतोवर घराबाहेर जाणे टाळावे.

६. ३१ डिसेंबरच्या दिवशी नागरिकांनी समुद्र किनारी, बागेत, रस्त्यावर अशा सार्वजनिक ठिकाणी मोठ्या संख्येने येऊन गर्दी करू नये. सोशल डिस्टन्सिंग राहिल तसेच मास्क व सॅनिटायझरचा वापर होईल याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे.

७. मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया, मरीन लाइन्स, गिरगाव चौपाटी, जुहून चौपाटी इत्यादी ठिकाणी देखील गर्दी करू नये.

८. फटाक्यांची आतषबाजी करण्यात येऊ नये. ध्वनीप्रदुषणाच्या पार्श्वभूमीवर नियमांचं पालन केलं जावं.

९. नववर्ष स्वागताच्या निमित्ताने कोणत्याही धार्मिक स्थळी गर्दी करू नये. तसेच कोणत्याही मिरवणुका आणि कार्यक्रमांना बंदी राहिल.

# कोविड नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पनवेल महसुलची दंडात्मक कारवाई

## पनवेल तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात ७१ पथके तैनात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

सध्या नाताळ सण आणि ३१ डिसेंबर न्यू इयर सेलिब्रेशनचे तरुणाईसह सर्वांनाच वेध लागले आहेत. परंतु कोरोनाचा नवा व्हेरिएंट असणाऱ्या ओमीक्रॉनचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाकडून नवी नियमावलीनुसार जाहीर करण्यात आली आहे. या दिवसांत सेलिब्रेशनसाठी गर्दी होऊन ओमीक्रॉनचा प्रसार वाढण्याची भीती असल्याने शासनाच्या आदेशानुसार तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महसूल प्रशासनाकडून पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांकडून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या न्यू इयर पार्ट्या, मास्कचा वापर न करणारे तसेच कोरोनाच्या नियमांचा भंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे.

पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यातील एकूण ७१ ग्रामपंचायतींच्या हद्दीमध्ये ७१ पथके तैनात करण्यात आली आहे आहेत. या पथकांमार्फत मास्क परिधान न करणे, सोशल डिस्टन्सिंगचे पालन न करणे, सामाजिक ठिकाणी गर्दी करणे, आदी कोविड अनुरूप वर्तन न करणारे नागरिक, आस्थापनांवर दंडात्मक कारवाई सुरू करण्यात आली आहे. महसूल विभागाचे मंडळ अधिकारी, विस्तार अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक यांच्या पथकांकडून न्यू इयरच्या पार्श्वभूमीवर करडी नजर ठेवण्यात आली असून सदर पथके ग्रामीण भागातील ग्रामपंचायतींच्या हद्दीत तैनात झाली आहेत.

> नुकतेच पनवेल परिसरात ओमीक्रॉनचे रुग्ण सापडले आहेत त्यामुळे ही बाब निश्चितच चिंतेची आहे. ओमीक्रॉन या नव्या व्हेरिएंटची व्याप्ती पनवेलमध्ये वाढू नये यासाठी नागरिकांनीही सहकार्य करणे अपेक्षित आहेत. ओमीक्रॉनच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नव्या नियमावलीनुसार कोविड अनुरूप वर्तन न करणारे नागरिक आणि आस्थापनांवर अशाच प्रकारे दंडात्मक कारवाई सुरू राहील. त्यामुळे नागरिकांनीही खबरदारी बाळगावी आणि कोरोनाच्या नियमांचे पालन करावे.
>
> **तहसीलदार विजय तळेकर, पनवेल**

या अनुषंगाने कोविड नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर महसुलच्या पथकांकडून कारवाईस सुरुवात झाली असून दोन दिवसांत एकूण १६ हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. याद्वारे सोमवारी (दि.२७ डिसेंबर) ३८ रेस्टोरंट्स, २० दुकाने, २५ सार्वजनिक स्थळे अशा एकूण ८३ ठिकाणांना भेटी देऊन पाहणी केली. यात कोव्हिड नियमांचे उल्लंघन करणारे २ रेस्टोरंट्स, ५ दुकाने, १० सार्वजनिक ठिकाणे अशा एकूण १७ ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून ८५०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला. यामध्ये सार्वजनिक ठिकाणी १७ जण विनामास्क फिरताना आढळून आले होते.

त्याचप्रमाणे मंगळवारी (दि.२८ डिसेंबर) ३५ रेस्टोरंट्स, २२ दुकाने, २६ सार्वजनिक स्थळे अशा एकूण ८३ ठिकाणांना भेटी देऊन पाहणी केली. यात कोव्हिड नियमांचे उल्लंघन करणारे ६ रेस्टोरंट्स, २ दुकाने, ७ सार्वजनिक ठिकाणे अशा एकूण १५ ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आली असून ७५०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला. यामध्ये सार्वजनिक ठिकाणी १५ जण विनामास्क फिरताना आढळून आले होते.

**विवाह सोहळे, बँक्वेट हॉल, रेस्टोरंट्स, न्यू इयर पार्ट्यांची ठिकाणे, फार्म हाऊसेस, आस्थापना, उद्याने, शॉपिंग मॉल, जिमखाना क्लब, नाईट क्लब, परमिट रूम, सिनेमागृहे, धार्मिक स्थळे, सार्वजनिक ठिकाणे, कोचिंग क्लासेस, खाजगी कार्यालये आदी ठिकाणी कोविड अनुरूप वर्तन न झाल्यास महसुलच्या पथकांमार्फत दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे.**

# महिला सरपंच खुनातील आरोपी गजाआड

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुक्यातील आदीस्ते गावच्या महिला सरपंच मिनाक्षी मनोहर खिडबिडे यांच्या खुन प्रकरणी एका तरुणाला अटक करण्यात आली आहे.

महाड तालुक्यातील आदिस्ते गावाच्या सरपंच मीनाक्षी मनोहर खिडबिडे यांच्या खुनातील आरोपीपर्यंत पोहोचण्यास महाड तालुका पोलिसांना यश आले असून शेजारी राहणार्या एका विवाहित तरुणाला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. श्वान पथकातील श्वानाने दाखवलेल्या मार्गानुसार पोलिसांना आरोपीपर्यंत जाणे शक्य झाले. अमीर शंकर जाधव वय ३० असे आरोपीचे नाव आहे. आदिस्ते गावच्या सरपंच मीनाक्षी मनोहर खिडबिडे यांचा निर्घृण खून झाल्याची घटना समोर आली होती. महिला सरपंचाच्या खुनाच्या घटनेने संपूर्ण महाड तालुका हादरला होता. त्यातच हि मयत महिला विवस्त्र अवस्थेत आढळून आल्याने प्रकरणाला एक वेगळेच वळण लागले होते. आरोपी ज्याठिकाणी मयत महिला सरपंच मीनाक्षी खिडबिडे राहत होत्या त्या शेजारीच राहत होता. आरोपी अमीर शंकर जाधव याने सदर महिला एकटी असल्याचा फायदा घेवून तिचे डोक्यात पाठीमागून लाकडी फाट्याने मारहाण करून तिला बाजूलाच असलेल्या बांबूच्या बेटामध्ये घेवून जावून तिचेवर अतिप्रंसग/बलात्कार करून तिचे डोक्यावर दगडाने मारून जखमी करून जीवे ठार मारले. सदर आरोपी विरोधात भादवी कलम ३०२, ३७६, २०१ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी अमीर शंकर जाधव याची चौकशी केली असता गुन्हा केल्याची कबुली दिली असून त्याकामी त्यास अटक करून मा.न्यायालयात हजर करण्यात आलेले आहे. आरोपी यास दिनांक ०४/०१/२०२२ पर्यत पोलीस कोठडी दिलेली असुन अधिक तपास सुरु आहे.

## संक्षिप्त...

### अखेर रेल्वे धावली, बीड जिल्ह्यासाठी सुवर्णक्षण

**बीड : वृत्तसंस्था**

मागील अनेक वर्षांपासूनचे बीड जिल्हावासियांचे स्वप्न आज अखेर पूर्णत्वास गेलं आहे. आष्टी ते नगर या लोहमार्गाचे साठ किलोमीटर काम पूर्ण झाल्याने, आज या लोहमार्गावर प्रत्यक्षात रेल्वेची हाई स्पीड चाचणी घेण्यात आलीय. बीडच्या खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा रंगला.

जिल्ह्यात पहिल्यांदाच रेल्वे आल्यानं, हे चित्र डोळ्यात साठवण्यासाठी लहान चिमुकल्यांसह स्थानिक नागरिकांनी गर्दी केली होती. रेल्वे इंजन डब्यांना जोडल्यानंतर स्थानिकांनी रेल्वेला हार आणि फुलं उधळून दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन केलं. लवकरच या मार्गावर प्रत्यक्षात रेल्वे सुरू करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही डॉ. प्रीतम मुंडे यांनी दिली आहे.

अहमदनगर बीड परळी रेल्वे मार्गावरील अहमदनगर ते कडा या ४१ किलोमीटर अंतरावर बुधवारी बारा डब्यांची रेल्वेची चाचणी घेण्यात आली. दुपारी २ वाजता सदरील रेल्वे कडा येथून आष्टी येथे आली. तर दुपारी ४ वाजता आष्टी रेल्वे स्थानकावर खासदार प्रीतम मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. त्यामुळे आता हिरवा झेंडा दाखवल्यानंतर आष्टी ते अहमदनगर हायस्पीड रेल्वे धावणार आहे.

# वाळूमाफियावर पनवेल तहसीलदारांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरातील रोडपाली येथील खारघर रेल्वे स्टेशन शेजारील खाडीत अवैध पद्धतीने वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियावर कारवाई करून, खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात वाळू माफिया वर गुन्हा दाखल केला आहे. या वेळी या कारवाई महसूल खात्याच्या पथकांनी वाळू च्या २ ते ४ कोड्या आणि सक्शन पंप उद्धवस्त केले आहे. त्या सोबत वाहतुकी साठी बनवण्यात आलेला रस्ता देखील जे सी बी च्या मदतीने खड्डा करून बंद केला आहे. या कारवाई मुळे पुन्हा वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

खारघर शहरातील रोडपाली येथील खारघर रेल्वे स्टेशन शेजारील खाडीत काही वाळू माफियांनी अवैध पद्धतीने वाळू उपसा सुरू केल्याची माहिती पनवेल चे तहसीलदार विजय तळेकर यांना लागली होती, या वाळू माफिया ची माहिती घेऊन, सदर ठिकाणी कारवाई करण्याचे आदेश प्रभारी मंडळ अधिकारी संतोष कचरे यांना दिली होती, त्या नुसार कचरे यांनी तलाठी डी.एल.पवार आणि सचिन पवार या पथकांनी तहसीलदार यांच्या आदेशानुसार घटनास्थळी जाऊन पहाणी केली असता, काही अज्ञात इसमानी अवैध पद्धतीने वाळू उपसा करून त्याच्या कोडी केल्याचे त्यांना दिसून आले.

त्या नुसार या जे सी बी च्या मदतीने वाळू चा केलेला साठा उध्वस्त केला तसेच कोडी केलेली वाळू देखील जे सी बी च्या मदतीने समुद्रात लोटून दिल्याची माहिती तहसीलदार यांनी दिली आहे. खारघर शहरातील ही आत्ता पर्यत ची चौथी कारवाई केल्याचे सांगितले जात आहे. या कारवाई बद्दल खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात वाळू माफियावर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. त्या नुसार खारघर पोलीस माफियाचा शोध घेत आहे.

# खोपटे नवनगर अधीसूचित क्षेत्राला (प्रकल्पाला) उरणमधील ग्रामपंचायतीचा तीव्र विरोध



**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने खोपटा नवनगर अधिसूचित क्षेत्रासाठी ३२ गावे (रायगड जिल्ह्याच्या पनवेल तहसीलची ७ गावे आणि उरण तह-सीलची २५ गावे) विकसित करण्यासाठी सिडकोने विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नैना प्राधिकरनाची नेमणूक केली आहे. त्यानुसार सर्वसमावेशक व उत्तम दर्जाची सोयी-सुविधांनी परिपूर्ण विकास करण्यासाठी खोपटा नवनगर अधिसूचित क्षेत्रातील ३२ गावाचा विकास आराखडा तयार करण्याचा इरादा सिडकोच्या नैना प्राधिकरनाने जाहीर केला आहे.मात्र त्यास उरण मधील सर्व शेतकऱ्यांचा, ग्रामस्थांचा तीव्र विरोध आहे.

याचाच एक भाग म्हणून सुमारे चार हजार वयक्तिक हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. यापूर्वी दोन ते तीन हजार हरकती दाखल झालेल्या आहेत. अनेक ग्रामपंचायतमध्ये ग्रामसभेत याबाबत विरोध करून तसे ठरावही घेण्यात आले आहेत. प्रत्येक गावात, प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये जनजागृती सुरु आहे.

दि २८ डिसेंबर २०२१रोजी कोप्रोलीचे सरपंच श्रीमती अलका म्हात्रे, उपसरपंच विपूल म्हात्रे, आवरेचे सरपंच श्रीमती निराबाई पाटील, सरपंच केळवणे संदिप घरत यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते रूपेश पाटील, गुरूनाथ गावंड, विश्वनाथ म्हात्रे, अनिल म्हात्रे, चंद्रशेखर ठाकूर, रोशन पाटील, प्रकाश पाटील, कुलदीप नाईक,

.../२

# फोर्ड इंडिव्हर गाडीची व्हॅगोनर गाडीस धडक ; ४ जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल जवळील कळंबोली-पुणे हायवे रोडवर अमेठी युनिव्हर्सिटी समोरच एका फोर्ड इंडिव्हर गाडीच्या चालकाने त्याच्या पुढे चाललेल्या वॅगेनार गाडीस जोरदार धडक देवून झालेल्या अपघातात त्या गाडीतील ४ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

रोनित धर (२९ रा.ठाणे) या त्याच्या ताब्यातील फोर्ड इंडिव्हर गाडी क्र.एमएच-४३-एआर-०००१ हा घेवून मुंबई ते पुणे जाणाऱ्या एक्सप्रेसवरील कि.मी.११/४०० येथून चालला असताना त्याने त्याच्या पुढे चाललेल्या व्हॅगेनर गाडी क्र.एमएच-१४-जीयु-१७९७ हीला पाठीमागून जोरदारपणे धडक दिल्याने झालेल्या अपघातात सदर गाडीतील लालमोहम्मद रुकमोद्दीन शेख (३५), सुकाराम पुरकाराम चौधरी (४५), बन्सी बहादूर गौतम (४२) व इदरील रहमत चौधरी (४४) सर्व रा.पुणे हे जखमी झाले असून त्यांना नजिकच्या रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहेत. या अपघ-ाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करण्याकडे नगरपरिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष

## कॅमेरे सुरू असताना पोलिसांना होत होती मोठ्या प्रमाणावर मदत

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

३ जून २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळामध्ये श्रीवर्धन तालुक्यात खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. वादळाचा लँडफॉल श्रीवर्धन व हरेश्वर समुद्रकिनारी झाल्यामुळे सर्वात जास्त तडाखा या भागांना बसला होता. श्रीवर्धन शहर पर्यटनाच्या दृष्टीने सध्या नावारूपाला आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने श्रीवर्धन नगर परिषदेला या ठिकाणी सीसीटीव्ही बसवण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला होता. त्यानंतर श्रीवर्धन नगर परिषदेने शहरा-तील बहात्तर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते. या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा डिस्प्ले श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय व श्रीवर्धन पोलीस ठाणे या ठिकाणी बसवण्यात आला होता.



सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्या अगोदर श्रीवर्धन शहरामध्ये चोऱ्यांचे प्रमाण वाढले होते. बंद घरे फोडून चोरट्यांनी अनेक वेळा माल लंपास केला होता. मात्र श्रीवर्धन शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्या नंतर चोरीचे एकही प्रकरण घडले नव्हते. श्रीवर्धन शहरात कोणत्या चौकामध्ये किंवा बाजारपेठेमध्ये वाहतूक कोंडी झाली आहे का? हे पोलिसांना पोलीस ठाण्यांमध्ये बसूनच कळत होते. मात्र निसर्ग चक्रीवादळा मध्ये श्रीवर्धन शहरातील अनेक झाडे पडली.

त्याच प्रमाणे विजेचे पोल बांगडी प्रमाणे गोल होऊन पडले. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे उभे केलेले खांब व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या वायर्स यादेखील वादळामध्ये नादुरुस्त झाल्या. सीसीटीव्ही कॅमेरे अनेक ठिकाणी फुटून देखील गेले. परंतु निसर्ग चक्रीवादळ होऊन गेलेल्याला आज जवळ जवळ दोन वर्ष

.../२

# विषप्रयोगाचे खेळ

माध्यमांचा अतिविस्तार आणि प्रभावामुळे एखादी नकोशी, असंस्कृत किंवा विस्मरणीय गोष्टही वारंवार काना-मना-डोळ्यांवर येऊन आदळत राहण्याची नवीच आफत ओढवली आहे. दोन दशकांपूर्वी असे नव्हते. त्यातच, जे वाचाळ आपल्या वाणीतून विष फेकत असतात, त्यांना ते नाकारणेही नंतर कठीण होऊन बसते; कारण सगळेच टिपले गेलेले असते. अनेक जण ते नाकारतही नाहीत. त्यांना तेच हवे असते. मूळचे अकोला जिल्ह्यातले असणारे 'कालिपुत्र कालिचरण महाराज' यांनी छत्तीसगडमध्ये रायपुरात भरलेल्या धर्मसंसदेत महात्मा गांधी यांचे नाव घेऊन गरळ ओकले; मात्र त्याची त्यांना खंत नाही. 'मला हवे असेल तर फासावर चढवा; पण मला माझ्या वक्तव्याचा किंचितही खेद वाटत नाही,' अशी शेखी ते मिरवत आहेत. अशा वेळी, खटले भरणे किंवा कायदेशीर कारवाई करणे, हे आवश्यक असते; मात्र ते दुधारी शस्त्रही असते. याचे कारण, कारवाईपाठोपाठ प्रसिद्धी येते आणि पाठीराख्यांना व संबंधित इसमालाही नवा चेव येतो. तेव्हा, खरे तर अशा मूर्खशिरोमणींकडे आणि कावेबाज दुष्टांकडे दुर्लक्ष करणे, हाच खरा मार्ग असतो. अर्थात, आपला समाज इतका प्रगत झालेला नाही आणि आजकाल प्रत्येक घटना, वक्तव्य, संघर्ष, गुन्हा हे सारे ताबडतोब 'राजकीय तराजू'त टाकले जाते. तेथे या साऱ्यांचे मूल्य, उपद्रवमूल्य किंवा उपयुक्तता मूल्य तपासून अशी प्रकरणे वाढतात किंवा शमतात. महात्मा गांधी यांच्या माथी फाळणीचा दोष मारणे आणि त्याच दमात त्यांच्या खुन्याचे समर्थन करून टाकणे, हे नवे नाही. खरे तर गांधीजी हे फाळणीला मान्यता देणारे शेवटचे काँग्रेसनेते होते. फाळणीची माउंटबॅटन योजना मंजूर झाली, त्या कार्यकारिणीच्या बैठकीला गांधी उपस्थित असण्याचा तर प्रश्नच नव्हता. नंतर 'या फाळणीत मला सारी संकटे दिसत आहेत,' असे हताश उद्गार त्यांना डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्यासमोर काढावे लागले. हा सगळा इतिहास खोलात जाऊन तपासता येईल. गांधी हे कडव्या हिंदुत्ववाद्यांचे कायमच सोपे लक्ष्य राहिले आहे. गांधी शरीराने संपून इतकी वर्षे झाली, तरी हे द्वेषाचे जालीम विष उतरायला तयार नाही, हेच कालिचरण महाराज यांनी दाखवून दिले. याच धर्मसंसदेत रामसुंदर दास या एकेकाळी काँग्रेसचे आमदार असणाऱ्या दुसऱ्या साधूंनी टाळ्या पिटणाऱ्या श्रोत्यांना खडसावून आणि जाब विचारून 'धर्मसंसद' सोडून दिली. त्यांनी व्यासपीठावर गांधींबाबत चार गोष्टी सांगितल्या, हे बरे झाले. हिंदू धर्म आणि राजकीय हिंदुत्व यांच्यातली सीमारेषा या देशातील धर्माचार्यांनी कटाक्षाने सांभाळली पाहिजे. ज्यांना आपल्या जिल्ह्यातल्या स्थानिक निवडणुकीत जिंकता येत नाही; त्यांनी भगवे कपडे चढवून असले विषाक्त धर्मकारण करावे, हे चालू देता कामा नये. एक साधू अशी मुक्ताफळे उधळत असताना, भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष आणि बेंगळुरूचे तरुण खासदार तेजस्वी सूर्या यांनी उडुपी श्रीकृष्ण मठाच्या कार्यक्रमात बोलताना, 'आता केवळ हिंदू धर्मातून होणारे धर्मांतर थांबवून चालणार नाही, तर पूर्वी जे हिंदू धर्म सोडून गेले आहेत, त्यांना मोठ्या प्रमाणात परत हिंदू धर्मात आणले पाहिजे आणि त्यासाठी देशातील मंदिर; तसेच मठांनी उद्दिष्ट ठरवून घेतले पाहिजे,' असे उद्गार काढले. आता त्यांनी ते उद्गार बिनशर्त मागे घेतले आहेत. लोकसभेतला एक निर्वाचित खासदार उघडपणे असे बोलू शकतो आणि देशाच्या सर्वधर्मसमभावी रचनेलाच धक्का लावतो, हे न पटणारे आहे. भारतात धर्मस्वातंत्र्य आहे, याचा अर्थ कुणीही उठावे आणि भारतीयांना कळप समजून आपापल्या धर्मात ओढून न्यावे, असे होत नाही. भारतातल्या धर्मांतरांच्या इतिहासाच्या अनेक बाजू आहेत. त्या समजावून न घेता, तेजस्वी सूर्या यांनी चिथावणीखोर वक्तव्य करण्याचा मार्ग निवडला. अनेक वर्षांपूर्वी तमिळनाडून मीनाक्षीपुरम् येथे झालेल्या सामूहिक धर्मांतराचा इतिहास तेजस्वी यांनी पाहिला असता, तर अशी विधाने केली नसती. अगदी अलीकडेही दक्षिणेतल्या अनेक दलित कुटुंबांनी धर्मांतराचा इशारा दिला होता. त्यामागची कारणे नेमकी काय असावीत? कालिचरण महाराज काय किंवा इतर कोणी काय; हिंदुत्वाचे झेंडे हातात घेऊन बेभान नाचणाऱ्यांनी आणि बेछूट बोलणाऱ्यांनी समाजाच्या तळागाळात, गावागावात आणि विशेषकरून सध्या उत्तरेतल्या अनेक राज्यांमध्ये नेमके काय चालू आहे, याचा परामर्श घ्यावा. आयुष्याच्या अखेरच्या काळात महात्मा गांधी यांनी दिल्लीत सफाई कामगारांच्या हरिजन वस्तीत मुक्काम केला. तिथल्या वाल्मिकी मंदिरात ते राहत. समर्थ रामदासांनी म्हटल्याप्रमाणे 'फुकाचे मुखी बोलता काय वेचे। दिसंदिस अभ्यंतरी गर्व साचे।' अशी या सगळ्या वाचाळवीरांची गत झाली आहे. अशा वक्तव्यांमधून सतत विषाची फवारणी करत राहायचे, हाच काहींचा कार्यक्रम असतो. त्यात देशाचे हित नाही; हिंदूंचे तर नाहीच नाही.

# कचेरी रोडवरील धोकादायक खड्डा सामाजिक बांधिलकी जपत अखेर माणगांवकरांनीच भरला

## वर्षभर मृत्युचा सापळा बनलेला खड्डा अखेर एका तासात हटवला



**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

अखेर सुजाण माणगांवकरांनी वर्दळीच्या कचेरी रोड वरील प्राणघातक बनलेला तो खड्डा श्रमदानातून जनहितार्थ भरला आहे. या ठिकाणी गेले वर्षभरापासून नागरिकांना तसेच येथून आपल्या दुचाकी चारचाकी वाहनांनी ये-जा करणाऱ्या शालेय विद्यार्थी, आबालवृध्द, महिला अशा प्रत्येकालाच धोकादायक असा हा खड्डा, अनेक वेळेस प्रशासनाचे मोठे अधिकारी, लोकप्रतिनीधी, नगरसेवकांना या बाबतीत माहिती देऊन ही कोणालाही याचे सोयरसुतक वाटले नव्हते.

अखेर माणगांव नगरीचे माजी सरपंच अनंता थळकर, पाणी पूरवठा कर्मचारी अविनाश पाटील, वैद्य हॉस्पीटल येथी रिक्षा स्टँण्ड युनियनचे अध्यक्ष चंद्रकांत मढवी, मा. ता. पत्रकार सेवा संघाचे अध्यक्ष कुवेसकर या चौघांनी श्रमदानातून हे दुर्लक्षित काम केले आहे. सकाळी मॉर्निंग वॉक साठी येणारे अनेकांनी या चांगल्या कामासाठी सुजाण सामाजिक कार्यकर्त्यांचे कौतुक केले असुन माणगांव-करांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. सामाजिक बांधिलकीतून हे कार्य नक्कीच अनेकांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे.

अनाठायी खर्च करणारे मोठ मोठे पुढाऱ्यांनी मनात आणले असते तर हे काम झाले असते. एक वर्षा पासून एखाद्याच्या अपघाती मृत्युचा हा सापळा एका तासात भरला. ईच्छाशक्तीचा अभावाने हे काम रखडले होते. नेमके हिच प्रबळ ईच्छाशक्ती कामी आली आहे. अनेकजण रस्त्यावरुन मुग गिळून ये-जा करतात पण माणगांवकर म्हणुन आपली जबाबदारी संवेदनशिलता त्यांनी हरवली आहे. यासाठीच अपघाता चा धोका लक्षात घेता एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ या उक्ती प्रमाणे एक चांगले कार्य या सुजाण माणगांवकरांडूनच घडले आहे.

# पोपटी पार्टीच्या प्रेमात पडले हास्य जत्रेतील कलाकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**



थंडीच्या मोसमामध्ये पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यामध्ये पोपटी पार्टी करणे ही परंपरा आहे. याची अनेकांना भुरळ पडली असून अनेक ठिकाणच्या फार्म हाऊस आणि शेतामध्ये या पोपटी पार्ट्या होत असतात. अशाच प्रकारे पेण येथे सुद्धा हास्य जत्रेतील कलाकारांची नुकतीच पोपटी पार्टी संपन्न झाली व ते या पोपटीची चव बघ दरवर्षी आम्ही पुन्हा याचा आनंद घेण्यासाठी येवू, असे सांगूनच त्यांनी निरोप घेतला.

रायगडमधील लोक हे खाण्याच्या बाबतीत हौशी म्हणून ओळखले जात असून मुंबई बरोबरच रायगड मध्ये थंडीची चाहूल लागली असल्याने खवय्यांचे पाय आता ग्रामीण भागात फार्म हाऊस आणि शेताकडे वळू लागले असून वालाच्या शेंगा बाजारात विक्रीसाठी दाखल झाल्याने ग्रामीण भागात पोपटी पार्टीला सुरुवात झाली आहे. पोपटीची भुरळ हि सर्वसामान्यांन बरोबरच देश विदेशात हास्य सम्राट असलेल्या महाराष्ट्राची हास्य जत्रेतील कलाकारांना सुद्धा लागली असून पोपटीची चव चाखण्यासाठी हे रतिमहारथी पेण येथील नंदू कल्याणकर यांच्या फार्महाऊसवर अवतरले होते. थंडीची चाहूल लागल्याने आता रायगड परिसरात थंडीने हिटची जागा थंडाव्याने घेतली आहे. हिवाळ्यात शहरातील पारा काही प्रमाणात खाली आला असून लोकांनी ठेवणीतले स्वेटर, मफलर, शाल तसेच कानटोपरे कपाटामधून बाहेर काढले आहेत. हिवाळा म्हंटले कि घाटमाथ्यावर तसेच विदर्भ पट्यात प्रत्येकाच्या शेतात हुरडा पार्टी जोरात चालतात. ग्रामीण भागातील सर्वांना हुरडा पार्टीची चाहुल लागते . गुलाबी आणि कुडकडणाऱ्या थंडीत शेतात शेकोटी पेटवून मोठ्या हिरव्या ज्वारीच्या कणसाचा हुरडा भाजून खाण्यात वेगळीच मौज असते. ग्रामीण भागात हुरडा म्हटले की सगळयांच्याच तोंडाला पाणी सुटते.शेतकऱ्याचा 'रानमेवा' म्हणून हुरड्याची ओळख आहे. एक चवदार, गोड, पौष्टिक आणि शरीरवर्धक पदार्थ म्हणून याकडे बघितले जाते. शेतातील ज्वारीचा हुरडा झाला की, सकाळ, सायंकाळी शेत माणसांनी फुलून जातात. चार-दोन माणसे जमली की शेतात शेकोटी पेटवायची, १०-२० टपोरे कणसं काढायचे आणि लालबुंद विस्तवावर भाजायची. निखाऱ्यात भाजलेली कणसे तरटावर किंवा हातावर चोळायची आणि मस्त ताव मारायचा. सोबत तोंडी लावायला प्रत्येकाच्या आवडीप्रमाणे हिरव्या मिरच्या भाजलेल्या, लाल लसणी चटणी, दही, गुळ आदींची चव अशा लज्जतदार हुरडा मेजवानीची मजा काही वेगळीच असल्याने शेजारी, मित्र मंडळी, सोयरे हायरे मोठ्या संख्येने हुरडा खाण्यासाठी जमतात. ग्रामीण भागात काहीच शेतकरी घरी चवीला ज्वारी व्हावी आणि जनावरांसाठी कडबा मिळावा म्हणून ज्वारी पेरतात. घाटमाथ्या वरील हुरडा पार्टी सारखी शेजारच्या कोकणात थंडीत शेतात मोगा पार्टी किंवा पोपटी करतात. यासाठी खड्ड्यात माठ ठेवून त्याच्यात खाली तळाला प्रथम मीठ आणि ओवा घालतात. या पार्टीसाठी येणारी सगळी मंडळी एखादा पदार्थ घेऊन येतात. त्यात पावट्याच्या शेंगा, मक्याची कणसं, भुईमुगाच्या शेंगा, रताळी असं कायबाय असतं. माठात याचे थरावर थर दिले जातात. मग ओव्याच्या वासाच्या पाल्याने माठाचे तोंड बंद केले जाते. वरून झाकण घालतात आणि त्याच्या बाजूने चगळचोथा, गवऱ्या, लाकडाच्या ढलप्या लावून ते पेटविले जाते. माठामध्ये भाज्यांचे थर कसे लावायचे, माठ शेकोटीत किती वेळ ठेवायचा या साऱ्याचे नियोजन जाणकार मंडळी करतात. फक्त चवीला मीठ व पचनाला ओवा एवढंच असूनही भाज्यांमुळं चवीमुळे ही मोगा पार्टी भलतीच बहारदार होते. देशावरची हुरडा पार्टी, कोकणातली मोगा आणि पोपटी पार्टी या प्रमाणेच खानदेशात भरीत पार्टी केली जाते. महाराष्ट्रात हिवाळ्या मध्ये प्रत्येक जिल्ह्यात हुरडा पार्टीचे प्रकार वेगळे असले तरी हिवाळ्यात रायगड जिल्ह्यात पोपटी हा प्रकार मोठ्या प्रमाणात बघायला मिळतो.अश्या या पोपटीच्या हास्य जत्रेतील अभिनेत्री विशाखा सुभेदार, अभिनेता पॅडी कांबळे, संगीतकार अमीर हडकर, चेतना भट, रसिका वेंगुर्लेकर, वनिता खरात, लेखक विनायक पुरुषोत्तम, गीतकार मंदार चोळकर, निखिल बने, वादक किशोर मोहिते, सुनील जाधव, श्याम बांगर, साहिल रेळेकर, आशिष महाडिक, गायिका मोनल कडलक, पोपटी शेफ प्रशांत शेडगे, दिग्दर्शक अनिरुद्ध शिंदे, वर्षा हडकर, कस्तुरी रेळेकर तसेच कल्याणकर कुटुंबिय हे त्यावेळी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित कलाकारांनी पोपटीचा आनंद लुटला तसेच पुन्हा एकदा नक्कीच येवू असा वादा सुद्धा केला. सर्वप्रथम मडकं, शेंगा आणि भांबुर्डीचा पाला स्वच्छ धुवून पूर्णपणे निथळून घेतात. मडक्याच्या तळाशी भांबुर्डीच्या पाल्याचा थर व्यवस्थित पसरवतात. त्यावर अर्ध्या शेंगा, थोडं चिकन, अर्धा डझन अंडी, अर्धे कांदे-बटाटे आणि वांगी ठेवतात. नंतर थोडासा ओवा व मीठाची पखरण केली जाते. पुन्हा भांबुर्डीचा पाला व उरलेल्या जिन्नसाचा असाच एक थर लावतात. त्यानंतर मडक्याचं तोंड पाल्यानं अगदी काळजीपूर्वक बंद केल्यावर अधिक दक्षता म्हणून दोन काठ्या उभ्या-अडव्या खोवव्यात.

> कुटुंब, पाहुणे, मित्र-मंडळी, कट्ट्यावरचे सोबती ते अगदी कार्यालयातील सहकारी अशा सर्वांना बोलावून पोपटी पार्ट्यांचं आयोजन होतं. कारण पोपटी लावल्यानंतर ती शिजेपर्यंत किमान अर्धा ते पाऊणतास वाट पाहावी लागते. मग त्यादरम्यान रंगतात धम्माल गप्पा, जुन्या आठवणी किंवा छोटेखानी, घरगुती गाण्यांच्या मैफली जमल्यावर त्या सारखा दुसर स्वर्गीय सुख नक्कीच नाही.
>
> **विशाखा सुभेदार, अभिनेत्री**

# खारघरमधील आरोग्य शिबीर आणि डोळे तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांची शिबिराला भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**



आमदार बाळाराम पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकरी कामगार पक्ष खारघर आणि जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या पुढाकाराने नागरिकांसाठी नायर सुपर स्पेशालिटी आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या माध्यमातून शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये नागरिकांच्या डोळ्यांची मोफत तपासणी करून आवश्यक असलेल्यांना मोफत चष्मा भेट म्हणून देण्यात आला.

निर्माण डायग्नोसिस सेंटर यांच्या माध्यमातून शरीराचे तापमान, ऑक्सीजन लेवल, ब्लड प्रेशर, आवश्यक असल्यास शुगरची मोफत तपासणी करण्यात आली. शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला.

या शिबिरामध्ये सेवेचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक नागरिकास जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून निर्माण डायग्नोसिस सेंटर, खारघर येथे होणाऱ्या सर्व रक्त तपासणीमध्ये ५०% सवलतीचे कार्ड देण्यात आले अशी माहिती देवेंद्र मढवी, शे.का.प. जिल्हा सहचिटणीस, पनवेल महानगरपालिका क्षेत्र यांनी दिली.

या शिबिराला नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती डॉ दत्तात्रय पाटील, खारघर शहर अध्यक्ष राम कारावकर, खारघर चिटणीस अशोक मोरे, जिल्हा सहचिटणीस देवा मढवी, पनवेल विधानसभा उपाध्यक्ष अजित अडसुळे, शेकाप नेते जगदीश घरत, रवी पाटील, जयेश कांबळे, दिलीप ठाकूर, बलराम ठाकुर, विलास ठाकूर, ज्ञानेश्वर पवार, हाफिस नावडेकर, शांताराम पाटील, किर्ती मेहरा, कल्पना खरे, संगीता गुलाटी, पिंकी शर्मा, सावंत मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते.

# १० वर्षीय मुलीचे अपहरण करुन तिच्यावर कारमध्ये लैंगिक अत्याचार करणारा नराधम गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली - खारघर परिसरात रिक्षा चालविणाऱ्या एका २३ वर्षीय नराधमाने कळंबोली भागात रहाणाऱ्या १० वर्षीय मुलीला व तिच्या दोन भावांना चिकन खाण्यास देण्याच्या बहाण्याने रिक्षातून खारघर परिसरात नेऊन, पीडित मुलीवर गॅरेजमधील कारमध्ये लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. प्रकाश चंद्रभुषण बिसुकर्मा (२३) असे या नराधमाचे नाव असून कळंबोली पोलिसांनी त्याला बलात्कारासह पोक्सो कलमाखाली अटक केली आहे.

या घटनेतील १० वर्षीय पीडित मुलगी कळंबोली परिसरात रहाण्यास असून गत २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ती आपल्या दोघा भावंडासह कळंबोलीतील डी-मार्ट समोर भरलेल्या मेळ्यामध्ये फिरण्यासाठी गेली होती. आरोपी चंद्रभुषण हा देखील रात्री ८ वाजण्याच्या सुमारास त्या भागात रिक्षा घेऊन गेला होता. यावेळी पीडित मुलगी व तिच्या भावंडासोबत कुणीही मोठी व्यक्ती नसल्याचे पाहून आरोपी प्रकाश बिसुकर्मा याने पीडित मुलगी व तिच्या भावंडाना चिकन खाण्यास देण्याचे अमिष दाखविले. त्यानंतर त्याने तिघांना आपल्या रिक्षामध्ये बसवून खारघरमध्ये नेले. त्यानंतर त्याने तिन्ही मुलांना आपल्या कारमध्ये बसवून काही अंतर नेऊन पीडित मुलीच्या दोन्ही भावांना कारमधून खाली उतरवून पीडित मुलीला आपल्यासोबत एका गॅरेजमध्ये नेले.

त्यानंतर त्याने पीडित मुलीला मारहाण करुन तिच्यावर कारमध्येच लैंगिक अत्याचार करुन तिला त्याच ठिकाणी सोडून पलायन केले. यावेळी पीडित मुलीच्या भावांनी कसेबसे कळंबोली येथील घर गाठून रिक्षा चालकाने त्यांच्या बहिणीला पळवून नेल्याची माहिती दिली. त्यानंतर पीडित मुलीच्या कुटुंबियांनी कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेतली. तर दुसरीकडे पीडित मुलीने एका रिक्षा चालकाची मदत घेऊन खारघर पोलीस ठाणे गाठून त्यांना घडल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर खारघर पोलिसांनी कळंबोली पोलिसांशी संपर्क साधून पीडित मुलीसोबत घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर कळंबोली पोलिसांनी पीडित मुलीने दिलेल्या माहितीवरुन खारघर मधील गॅरेजमध्ये जाऊन, आरोपी चंद्रभुषण याची कार ताब्यात घेऊन त्याला देखील अटक केली.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मेसर्स जय इंटरप्रायझेस प्रॉपर्टी कन्सल्टंट आणि डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री.घेवर राम पटेल व श्री.त्रिलोक राम पटेल यांनी खालील वर्णनाचा भूखंड मिळकत तीचे मालक १) श्री.देवेंद्र बाळाराम कोळी, २) श्री.महेंद्र ज्ञानेश्वर कोळी, ३) श्री.संतोष बाळाराम कोळी, रा.कोंबडभुजे, पोस्ट : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड यांचेशी चर्चा करून सदरची भूखंड मिळकत विकसनाकरिता घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**पुष्पक नोड वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड**

| सेक्टर | भूखंड क्रं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| २५ | ३१७ | २१० |

याप्रमाणे भूखंड मिळकतीचे वर्णन असून सदर मिळकत ही सदर भूखंड मिळकतीचे मालक यांना नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाकरिता भूसंपादनाचा मोबदला व पुनर्वसनाचा लाभ म्हणून सिडको तर्फे वितरित करण्यात आलेला आहे. सदरचा भूखंड आमचे अशिलांनी विकसनाकरिता घेण्याचे ठरविले असून सदर भूखंडाबाबत कोणाही व्यक्तींचे गहाण, दान, लीज, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, विकसन करारनामा, कुळहक्क, वहिवाटीचे हक्क, ताबा-कब्जा, भाडेपट्टा, कोणत्याही बोजा वा अन्य कोणतेही हक्क व हितसंबंध असल्यास अथवा आमचे अशिल सदर भूखंड मिळकतीचे करत असलेल्या विकसन कराराच्या (Development agreement) व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्तीने अथवा संस्थेने आपली हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी पोस्टामार्फत अथवा स्वतः हजर होवून सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. सदर नोटीस कालावधीनंतर व विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीत कोणाचाही हक्क व हितसंबंध व हरकत नाही असे समजून सदर मिळकतीचे आपल्या लाभांत विकसनाचा करार अगर व्यवहार नोंदणीकृत करून सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.२९/१२/२०२१

**सही/-**
**ॲड.राखी व्ही. घरत**
**शॉप नं.१५, प्रभात सेंटर,**
**से.१ ए, सी.बी.डी.बेलापूर**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरणमधील ग्रामपंचायतीचा तीव्र विरोध

उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, पंकज ठाकूर, कोप्रोली, आवरे, कळंबूसरे, केळवणे या ग्रामपंचायती सह पाणदिवेचे ग्रामस्थ आदींनी प्रांजली केणे -सिडको मुख्य नियोजनकार (नैना) बेलापूर, नवी मुंबई यांच्या कार्यालयात जाऊन खोपटे नवनगर प्रकल्पास विरोध म्हणून सुमारे चार हजार वयक्तीक हरकती दाखल केल्या आहेत.

## श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करण्याकडे नगरपरिषदेचे अक्षम्य दुर्लक्ष

पूर्ण होत असताना देखील श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे दुरुस्त करण्याकडे श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत आहे. शहरात सीसीटीव्ही कॅमेरे असल्यामुळे पोलिसांना याअगोदर गुन्ह्यांचा तपास करणे अत्यंत सोपे जात होते. एकदा मुंबई येथे एका हॉटेल मालकाचा खुन करून पळून आलेले आरोपी श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही मुळे पकडण्यात पोलीसांना यश आले होते. तरी श्रीवर्धन नगरपरिषदेने नादुरुस्त झालेले सीसीटीव्ही कॅमेरे पुन्हा दुरुस्त करून बसवावेत अशी मागणी शहरातील नागरिकांमधून केली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## थर्टीफस्टला हजारो बोकड आणि कोंबड्यांची कत्तल होणार तळीराम निवांत जागेच्या शोधात

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी अनेक जण उत्सुक असून त्यांची ही उत्सुकता शिगेला पोहचली असून फक्त तीन दिवसांवर २०२१ या वर्षाला निरोप देण्याची वेळ आली असून केवळ पन्नासीतले नाहीतर तर १८ वर्षावरील तरुण सुद्धा थर्टीफस्ट ची जुळव-ाजुळव करत असताना कोणते ठिकाण सुरक्षित आहे याकडे गांभीर्याने पाहत आहेत. गेल्या वर्षी कोरोनामुळे दारूची दुकानं आणि चिकन, मटणाची दुकानं काही प्रमाणात बंद होती. त्यामुळे तळीरामांची मोठी कोंडी झाली होती. यावर्षी कोरोना हद्दपार होत असताना पनवेल सारख्या शहरामध्ये तो वेगाने फोफावत असल्याच्या बातम्या वर्तमान पत्रामध्ये वाचावयास मिळत आहेत. पुन्हा लाकडाऊन होणार असल्याचे संकेतही मिळत आहेत. हे लाकडाऊन थर्टीफस्टच्या अगोदर झाले तर खवय्यांची आणि तळीरामांची मोठीच पंचायत होणार आहे. त्यामुळे तळीरामांची अमोदरच धावपळ सुरु असल्याचे पाहवयास मिळत आहे. ग्रामीण भागातील फार्महाऊस जवळ जवळ बुकिंगने हाऊसफुल्ल होण्याच्या मार्गावर आहेत. जुन्या वर्षाला निरोप देताना हजारो बोकड आणि कोंबड्यांची मोठ्या प्रमाणावर कत्तल होणार आहे.

# पोलिसांकडे बघताना चांगल्या भावनेतुन पहा त्याच्या वेदनांची जाणीव होईल : संजय भावसार

## खोपोली अखिल भारतीय पोलीस हक्क संरक्षण संघटनेच्या वतीने पोलीस बांधवांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । खोपोली**

अखिल भारतीय पोलीस हक्क संरक्षण संघटना यांच्या वतीने २४ तास सेवा देणाऱ्या पोलीस बांधवांनी केलेल्या उल्हेकनिय कामगिरी बाबत गुणवंत पोलीस बांधव व महिला पोलिसांचा सन्मान सोहळा नुकताच खोपोली शहरातील ब्राम्हण सभागृहात पार पडला. यावेळी पोलीस मानवच आहे तो समाजाची सेवा करीत असताना तहान भूक विसरून स्वताची नाहीच पण परिवारची ही पर्वा न करताना जनतेच्या संरक्षणासाठी कार्यरत असतो त्यामुळे त्यांचे अधिक मनोबल वाढविण्यासाठी संघटनेच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात पोलिसांकडे बघताना सकारत्मक भावनेतून पाहिल्यास त्याच्या वेदनांची जाणीव होईल असे मत आ भा पो हक्क संरक्षण संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष संजय भावसार यांनी व्यक्त केले.



यावेळी खोपोली पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या हस्ते गणेशाचे पूजन करून दीप प्रजोलीत करण्यात आले. यावेळी अध्यक्ष संजय भावसार, महिला राष्ट्रीय अध्यक्षा सौ किरण देशपांडे, राज्य महिलाध्यक्षा तनुजा गुळवी, ठाणे जिल्हा अध्यक्षा ताराराणी, ब्रिगेड मेघा मोरे यासह जिल्हाध्यक्ष मधुकर परशुराम घारे, उपाध्यक्ष निलेश भगवंत विचारे, सचिव सुनिल ठाकूर, सहसचिव नितेश कदम, कोषाध्यक्ष प्रशांत गोपाळे, नगरसेवक राजू गायकवाड, नगरसेविका निकिता नितीन पवार, महिला जिल्हाध्यक्षा कविता खोपकर, पुणे जिल्हाध्यक्षा स्मिता दुसाने, पुणे जिल्हाध्यक्ष संतोष ठाकूर, बदलापूर गौरी ठाकूर, सोनालीताई यासह जुन्नर तालुकअध्यक्षा शारदा कसबे, रायगड उपाध्यक्षा वर्षा मोरे, सचिव आरती कुभांर, सहसचिव सुनेत्रा भिसे, कोषाध्यक्ष अक्षरा चौधरी, सहकोषाध्यक्ष रजनी म्हामुणकर, संघटक सुलक्षणा दाभाडे, प्रसिद्धीप्रमुख साधना पाटील, सहकोषाध्यक्ष भरत पाटील, जिल्हा संघटक हिरोजी देशमुख, संपर्क प्रमुख रमाकांत म्हामूणकर, प्रसिध्दीप्रमुख राजू रणवीर,तालुका अध्यक्ष संजय देशमुख, सचिव संजय म्हामूणकर, सहसचिव सोपान कालेकर, कोषाध्यक्ष संतोष सांवत, संघटक समिश पाटील, प्रसिद्धीप्रमुख विश्वनाथ म्हशीळकर, महिला तालुका अध्यक्षा अँड.तेजश्री करंजकर, उपाध्यक्षा भारती सणस, सचिव मानसी पवार, सहसचिव भारती पाटील, कोषाध्यक्ष मंजुळा गोरे, सहकोषाध्यक्ष किशोरी चेउलकर, संपर्कप्रमुख हेमलता कर्णुक यासह एन सी सी प्रमुख शीतल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खोपोली पोलीस ठाण्याचे शिरीष पवार व खालापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल विभूते यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गुन्हे उघड केले त्या महिला पोलीस व पोलीस बांधवांचा सन्मान करण्यात आला. यावेळी खोपोली पोलीस निरीक्षक यांनी जनतेची सेवा करणे हे आमचे कर्तव्यच आहे. जनतेने ही सहकार्याची भूमिका ठेवल्यास सेवा करताना अधिक सोपं जाईल तसेच चोऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येक सोसायटी मध्ये सी सी टीव्ही लावण्यात यावी असे आवाहन यावेळी पवार यांनी केले तर महाराष्ट्र अध्यक्ष संजय भावसार यांनी आपले विचार व्यक्त करताना सामाजिक कार्य करताना ब्रेकर असतील तर खर सामजिक काम करण्याची धडपड समजून पोलीस बांधव हा समाज संरक्षण करीत असताना ना ऊन ना पाऊस दिवस ना रात्र पाहत असतो. त्यामुळे पोलिसांकडे बघताना चांगल्या भावनेतुन पहा त्याच्या वेदनांची जाणीव होईल पोलीस हा ही माणूस हे त्यांना आपल्या भावनांच्या साठी संरक्षक संघटना नाही ते राजकीय दबावा खाली कधी कधी काम करावे लागते पोलीस खात्याकडे पाहताना सकारत्मक दृष्टीने पाहायला शिका त्यांना बळ देण्यासाठी आपण ही पुढे आले पाहिजे असे मत महाराष्ट्र अध्यक्ष संजय भावसार यांनी व्यक्त केले.

**जाहीर नोटीस**

मे.ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथमवर्ग कर्जत यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.३०६/२०२१
ने.ता.२९/०१/२०२२

सौ.बायमा विलास निमणे
वय : ५६, धंदा : गृहिणी
रा.बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

सरपंच / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत उमरोली
मु.उमरोली, ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाले

अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम
१९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे

अर्जदार यांनी कर्जत येथील ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब, प्रथम वर्ग यांचे कोर्टात चौ अर्ज ३०६/२०२१ हा अर्ज अर्जदार यांनी त्यांची आई कै.यमुनाबाई वाळकु दाभणे यांचा मृत्यू दि.०९/११/१९८९ रोजी मु.कोषाणे, ता.कर्जत, जि.रायगड येथे झाला. अर्जदार यांच्या आईच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत उमरोली येथे त्यांचे मृत्यू नोंदणी रजिस्टरमध्ये केलेली नसल्याने अर्जदार यांनी त्यांच्या आईच्या मृत्यूची नोंद घेणेकामी मा.कोर्टाकडून आदेश मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जदार यांच्या आईच्या मृत्यूची दि.०९/११/१९८९ ही नाही व तसा मृत्यू नोंदणीचा आदेश देण्यात येवू नये, असे म्हणणे असेल त्यांनी उपनिर्दिष्ट प्रकरणी मा.कोर्टात दि.१२/१/२०२२ अथवा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत हजर राहून आपल्या हरकती लेखी कळवाव्यात. जर मुदतीत कोणाकडूनही हरकत उपस्थित झाली नाही तर मा.कोर्ट अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवून अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचे लाभांत त्यांची उशिराने झालेली नोंद करण्याचा आदेश पारित करेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.२८/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**कनिष्ठ न्याया, कर्जत**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**कनिष्ठ न्याया, कर्जत**

# पुष्कर राजस्थान येथील राष्ट्रीय दिव्यांग पॅरा कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र आणि मुंबई संघ कबड्डी संघ उपांत्य फेरीत



**दै.रायगड नगरी । तळा**

पुष्कर, राज्यस्थान येथे चालू असणाऱ्या राष्ट्रीय दिव्यांग पॅरा कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्र व मुंबई पॅरा कबड्डी संघाने चांगली कामगिरी करत आपले स्थान प्रस्थापित करून आज उपांत्य फेरीत सहभागी झाले आहेत. राजस्थानचे माजी मुख्यमंत्री जनार्दनसिंह गहलोत यांच्या स्मृतीदिनानिमित्त राष्ट्रीय पॅराकबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राने अ गटात झारखंड बिहार, मुंबई व उत्तर प्रदेश या संघाना हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला तर मुंबई संघाने झारखंड, बिहार व उत्तर प्रदेश या संघाना हरवून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

महाराष्ट्र संघाकडून रायगड जिल्ह्यातील राजेश मोकल, अक्षय निकम, ओमकार महाडिक व कर्णधार रमेश सकपाळ, मुकुल खाडे नंदुरबार जिल्ह्यातील महेश वसावे, सांगली जिल्ह्यातील आरिफ शेख आणि मुंबई संघाकडून नंदुरबार जिल्ह्यातील रायसिंग वसावे, सांगली जिल्ह्यातील ज्योतिराम कदम रायगड जिल्ह्यातील कर्णधार मंगेश म्हात्रे, गणेश पाटील यांनी चांगली कामगिरी केली असे कुलाबा दिव्यांग क्रिडा असोसिएशन महाराष्ट्र व सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था रोहा रायगडचे सचिव व दोन्ही संघाचे व्यवस्थापक शिवाजी पाटील व सहव्यवस्थापक संकल्प अपंग संस्थेचे सचिव बाबाराव धोत्रे यांनी माहिती दिली.

# निर्धार सामाजिक संस्थेकडून दिपक बोराडे सन्मानित

**दै.रायगड नगरी । कर्जत**

राज्यात विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या सामजिक संस्था, शिक्षक, पत्रकार, खेळाडू आणि वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्याचा सन्मान पांचवेल शहरातील कामोठे येथील निर्धार सामजिक संस्थेच्या वतीने वर्धापनदिनाचे औचित्य साधून सन्मानित करण्यात आले

कर्जत तालुक्यातील पत्रकार दिपक बोराडे, यांच्या ग्रामीण पत्रकारितेच्या बरोबरच आदिवासी भागातील वंचीत घटकांसाठी विविध सामजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना निर्धार सामजिक संस्थेने चौथ्या वर्धापनदिनानिमित्त कामोठे येथील शीतलधारा हॉल मध्ये आयोजित केला होता. यावेळी पनवेल संघर्ष समितीचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांच्या हस्ते त्यांना स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले, तसेच कर्जत तालुक्यातील भागूचीवाडी येथील रायगड जिल्हापरिषद शाळेचे मुख्याध्यापक हरीचंद्र आढारी यांचा देखील सन्मान करण्यात आला.



या कार्यक्रम प्रसंगी नगरसेविका लीना गरड, कफ संस्थेच्या मा.रंजना सडोलीकर, पोलीस निरीक्षक अर्जुन गरड, कामोठे कॉलनी फोरम अध्यक्ष मंगेश आढाव, कोकण विभाग पत्रकार संघाचे खजिनदार स्वामींनाथ वेहले, तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ग्रामपंचायत विचुंबे

**ता.पनवेल, जि.रायगड**

## जाहीर सूचना २०२१/२२

दि.३०/१२/२०२१

ग्रामपंचायत विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड हे ग्रामपंचायत विचुंबे हद्दीतील पुढील विकासकामे / साहित्य यांची अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | **वनश्री सोसायटी ते श्री ज्ञानेश्वर माऊली सोसायटी पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे. (एल.ई.डी) (१४ वा वित्त आयोग निधी)** | **३५६६४३/-** | **३५६६/-** | **०६/०१/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत)** | **०६/०१/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत)** |

**अटी व शर्ती**

१) निविदा मिळणेकरिता दि.३०/१२/२०२१ ते ०६/०१/२०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.३०/१२/२०२१ ते ०६/०१/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दि.०६/०१/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४) आलेल्या निविदा दि.०६/०१/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत विचुंबे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९) निविदा किंमत ना परतावा राहील.
१०) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
११) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
१२) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, १% कर्मचारी विमा, ०.१५% सर चार्ज रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३) कामाच्या आदेशाप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसऱ्या ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.
१४) झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.
१५) निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरू करणे बंधनकारक आहे.
१६) मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१७) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१८) सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
१९) काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत.
२०) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
२१) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/-**
**श्री.सुहास विष्णू वारे**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**सौ.नम्रता आकाश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत विचुंबे,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

मा.गोडसे सो
अर्जदारांतर्फे वकील : ॲड.दिपक म. ठाकूर

**जाहीर नोटीस**

दि.चौ.अर्ज क्रं.१४७५/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२७/०१/२०२२

१) श्री.मोहन कृष्णा बुटाला
वय वर्षे ८१, व्यवसाय : रिटायर्ड
रा.प्रिया अपार्टमेंट, रुम नं.१०२/१०३, लोखंडीपाडा,
गीतांजली सोसायटी जवळ, परदेशी आळी, पनवेल
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६
२) श्री.संदेश मोहन बुटाला
वय वर्षे ५४, व्यवसाय : धंदा
रा.प्रिया अपार्टमेंट, रुम नं.१०२/१०३, लोखंडीपाडा,
गीतांजली सोसायटी जवळ, परदेशी आळी, पनवेल
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६
३) सौ.संपदा गजानन मेहता
वय वर्षे ५५, व्यवसाय : धंदा
रा.प्रिया अपार्टमेंट, रुम नं.१०२/१०३, लोखंडीपाडा,
गीतांजली सोसायटी जवळ, परदेशी आळी, पनवेल
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड-४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार क्र.१ यांची पत्नी व अर्जदार क्र.२ व ३ यांची आई कै.संगीता मोहन बुटाला हिचे निधन दि.२८ एप्रिल २०१६ रोजी राहत्या घरी म्हणजेच प्रिया अपार्टमेंट, रुम नं.१०२, लोखंडीपाडा, तालुका : पनवेल येथे झाले. अर्जदार यांनी तिच्या मृत्यूचा दाखला या अर्जासोबत दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या व्यतिरिक्त कै.संगीता मोहन बुटाला यांना इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. सदर मयताचे मृत्यूपश्चात वरील अर्जदारांची वारसनोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. कै.संगीता मोहन बुटाला ह्या मयत असून, त्यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावाची नोंद असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**कै.संगीता मोहन बुटाला यांचे नावे असलेल्या सदनिकेचे / मिळकतीचे वर्णन**

**मिळकत क्र.१ :- प्रिया अपार्टमेंट, रुम नं.१०२, लोखंडीपाडा, गीतांजली सोसायटीजवळ, परदेशी आळी, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ४११ चौ.फूट बिल्टअप**

**मिळकत क्र.२ :- प्रिया अपार्टमेंट, रुम नं.१०३, लोखंडीपाडा गीतांजली सोसायटीजवळ, परदेशी आळी, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र ६५६ चौ.फूट बिल्टअप**

सदरची मिळकत अर्जदार मोहन कृष्णा बुटाला व कै.संगीता मोहन बुटाला यांच्या संयुक्तीत मालकीची (Joint Property) असून त्यात कै. संगीता मोहन बुटाला यांचा ५०% वाटा म्हणजेच अर्धा हिस्सा आहे व त्यासाठी अर्जदारांना वारस दाखल्याची गरज आहे. सदरहू मिळकत ही त्यांच्या नावे हस्तांतरीत होण्यासाठी अर्जदारांना वारस दाखल्याची गरज आहे. परंतु त्या हयात नाहीत, त्यांचे वारस म्हणून वरील अर्जदार यांस सदरहू सदनिका मिळाव्यात म्हणून या न्यायालयात वारस दाखल्याचा अर्ज केला आहे.

सदरहू अर्जदारांना वारस दाखला देणे विषयी कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत कोर्टात दाखल करावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि.२२/१२/२०२१ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(हक्कसोड पत्राबाबत)**

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मूळ भूधारक कै. जनार्दन नामा पाटील (गायकवाड) यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| संचिका क्र./ नोड | मौजे/ निवाडा क्र. | संपादित सर्व्हे क्र. / हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर) | इरादित भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| ५७२/उलवे | गव्हाण २३ | ४५/६ ४७/९ | ०-३४-७ | उलवे | ९ | २१ | १६०० |

शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार साडेबारा टक्के योजनेअंतर्गत भूधारक कै जनार्दन नामा पाटील (गायकवाड) यांना त्यांची **३०० चौ.मी.** पात्रता एकत्रिकरणाद्वारे उलवे नोड येथे **भूखंड क्र.२१, सेक्टर-९, क्षेत्र-१६०० चौ.मी** या भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या भूधारक १. श्री सुरेश भाऊ भोईर २. गणेश भाऊ भोईर ३. जानकूबाई परशूराम वास्कर ४. ताई उर्फ अस्मिता रमेश कोळी ५. महादेव पांडूरंग कोळी ६. प्रेमा अनंत कोळी ७. श्रीमती ऋतिका अनंत कोळी उर्फ ऋतिका विशाल कोळी ८. मोनिका अनंत कोळी उर्फ मोनिका विनोद कोळी ९. स्नेहा उर्फ नेहा नितीन म्हात्रे १०. नर्मदा दत्तात्रेय कोळी ११. धनंजय जनार्दन कोळी १२. भारत जनार्दन कोळी यांनी सह दुय्यम निबंधक यांच्याकडे हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ १. सौ. जयाबाई नरेश अजाने २. आकाश अनंत कोळी ३. भारती गणेश कोळी यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहे. सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '**१०अ**' मधील **मूद्दा क्र. ii** अन्वये संबंधीत हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र, सेक्टर क्र, व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे हक्कसोडपत्रामध्ये इरादित **भूखंड क्र.२१, सेक्टर-९, क्षेत्र-१६०० चौ.मी पैकी ३०० चौ मी.** भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे गव्हाण, निवाडा क्र. २३, स.नं/हि.नं-४५/६, ४७/९, क्षेत्र-०-३४-७ हे.आर या संपादित जमिनीचा उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| १. श्री. सुरेश भाऊ भोईर | १. सौ. जयाबाई नरेश अजाने |
| २. गणेश भाऊ भोईर | २. आकाश अनंत कोळी |
| ३. जानकूबाई परशूराम वास्कर | ३. भारती गणेश कोळी |
| ४. ताई उर्फ अस्मिता रमेश कोळी | |
| ५. महादेव पांडूरंग कोळी | |
| ६. प्रेमा अनंत कोळी | |
| ७. श्रीमती ऋतिका अनंत कोळी उर्फ ऋतिका विशाल कोळी | |
| ८. मोनिका अनंत कोळी उर्फ मोनिका विनोद कोळी | |
| ९. स्नेहा उर्फ नेहा नितीन म्हात्रे | |
| १०. नर्मदा दत्तात्रेय कोळी | |
| ११. धनंजय जनार्दन कोळी | |
| १२. भारत जनार्दन कोळी | |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त भूखंडाचे वाटप स्वीकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|
| १. सौ. जयाबाई नरेश अजाने |
| २. आकाश अनंत कोळी |
| ३. भारती गणेश कोळी |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमूद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबंधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३६९/२०२१-२२

# संक्षिप्त...

## कारचा अपहार करून फरार झालेल्या ट्रव्हल्स एजंटचा पोलिसांकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऐरोलीतील एका ट्रॅव्हल एजंटने कोपरखैरणेतील एका व्यावसायिकाची होंडा अमेझ कार ३० हजार रुपयांच्या पॅकेजवर लावण्याच्या बहाण्याने घेऊन त्यांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. संतोष झा असे या ट्रव्हल्स एंजटचे नाव असून सध्या तो फरार झाल्याने कोपरखैरणे पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणातील कार मालक दिलीप खरे (५१) हे कोपरखैरणे सेक्टर-१९ मध्ये कुटुंबासह रहाण्यास असून त्यांनी २०१७ मध्ये व्यावसाय करण्यासाठी होंडा अमेझ कंपनीची टी परमिट कार खरेदी केली होती. त्यानंतर त्यांनी ओला व उबेर कंपनीच्या माध्यमातून कार चालविण्यास सुरुवात केली होती. गत फेब्रुवारी महिन्यामध्ये खरे यांची कार घरीच असल्याने त्यांनी सदर कार एखाद्या कंपनीमध्ये चांगल्या पॅकेजवर लावण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. त्यावेळी ऐरोली सेक्टर-२० मधील श्री दत्त ट्रव्हेल्स मधील संतोष झा हा चांगल्या पॅकेजवर कार लावून देत असल्याची माहिती दिलीप खरे यांना मिळाली होती. त्यामुळे त्यांनी संतोष झा याला संपर्क साधला असता, त्याने दर महिन्याला ३० हजार रुपये पॅकेजवर त्यांची कार लावून देण्याचे आश्वासन दिले होते. संतोष झा याने गाडी पॅकेजवर लावल्यानंतर पहिले ४५ दिवस कोणतेही पेमेंट मिळणार नसल्याचे तसेच करारनामा देखील करता येणार नसल्याचे खरे यांना सांगितले होते. त्यामुळे खरे यांनी झा याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून गत जून महिन्यात त्याला आपली कार दिली. त्यानंतर जुलै महिन्यात खरे यांनी संतोष झा याची भेट घेऊन कारच्या भाड्याबाबत विचारणा केली असता, लवकरच भाडे देण्याचे तसेच वडील आजारी असल्याचे कारण सांगत करारनामा करण्यास टाळाटाळ केली. खरे यांनी वारंवार संपर्क साधल्यानंतर संतोष झा याने ऑगस्ट महिन्यात ११ हजार रुपये देऊन कारारनामा नंतर करण्याचे आश्वासन खरे यांना दिले. त्यानंतर देखील भामट्या संतोष झा याने वेगवेगळी कारणे सांगून दिलीप खरे यांना कारचे भाडे देण्यास तसेच करारनामा करण्यास टाळाटाळ केली. त्यानंतर झा याने दिलीप खरे यांचे फोन न घेण्यास टाळाटाळ सुरु केल्याने खरे यांनी गत ऑक्टोबर महिन्यात ऐरोली येथील श्री दत्त ट्रव्हेल्सच्या कार्यालयात जाऊन चौकशी केली असता, संतोष झा त्याठिकाणी बसत नसल्याचे तसेच त्याच्या विषयी काहीच माहिती नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर संतोष झा याने फसवणूक करुन त्याच्या कारचा अपहार केल्याचे लक्षात आल्यानंतर खरे यांनी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# स्वातंत्र्याच्या पंचहत्तरीनंतरही उरण तालुक्यातील आदिवासी वाड्या पारतंत्र्यातच

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुका औद्योगिकरणाने झपाट्याने प्रगतशिल असतांना जेएनपीटी, ओएनजीसी, बिपीसीएलसह विविध प्रकल्प तालुक्यात असूनही उरणच्या आदिवासी वाड्या स्वातंत्र्याच्या पंचहत्तरीनंतरही पारतंत्र्यात असल्याचे प्रत्यक्ष पाहणी नंतर ही दिसून येत आहेत. शासनाच्या धोरणानुसार गाव तिथे रस्ता असताना शासनाच्या वनविभागाकडूनच विकासासाठी अडथळा निर्माण होत असल्याचे आदिवासींकडून बोलले जात आहे.



उरणतालुक्याचे दोन भाग आहेत. एक विभाग पश्चिम आणि दुसरे पूर्व विभाग, पूर्व भाग हा ग्रामीण भाग म्हणून ओळखला जात आहे. या भागामध्ये डोंगर भागात आदिवासी वाड्या वसलेल्या आहे. पुनाडे पासून ते जांभुळपाडा रानसई परिसरात आदिवासी वाड्या वसलेल्या आहेत. आदिवासी वाड्यामधील रानसई ग्रामपंचायत परिसरामध्ये ६ आदिवासी ठाकूर वाड्या आहेत. खैरकाठी, मार्गाची वाडी, बंगल्याची वाडी, सागाची वाडी, खोंड्याची वाडी, भुऱ्याची वाडी, साधारणपणे सहा वाड्यामध्ये १ हजार २७६ लोकसंख्या आहे. त्यामधील ८२५ पेक्षा जास्त मतदान आहे. वाड्यामध्ये विकासाच्या नावांनी बोंबाबोंब आहे. रस्ते झालेले नाहीत. या वाड्यात जाण्यासाठी पनवेल तालुक्यातून रस्ता आहे आणि उरणच्या टाकीगाव येथून ही रस्ता आहे. शासनाच्या मुख्यमंत्री सडक योजनेतून रस्ता मंजूर आहे परंतु वनविभागाच्या खोड्यामुळे फक्त खडीकरण झाले आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. भाजी पाला लावून उदर निर्वाह चालविला जातो परंतु वाहतूक साठी मोठी पायपीट करावी लागत आहे. खर पाहता रानसई धरण हा या वाद्यांच्या उशाशी आहे परंतु आदिवासी बांधवांच्या कोरड घशाशी आहे. प्रत्येक वादीमध्ये विहीर आहे परंतु यांचे पाणी शेवट पर्यंत शिल्लक राहत नाही. गेले अनेक वर्षे हीच परिस्थिती आहे.

डी पी वर्ड या नामक कँप्रणीने येथील पाच वाड्यामध्ये पाणी शुद्धीकरण केंद्र बसविले आहे. या उदघाटन ही रायगड च्या पालक मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले होते. सोलर द्वारे पाणी ही विहिरीतून पाणी शुद्धीकरण केंद्रापर्यत पोचविले गेले होते परंतु विहरीतच पाणी शिल्लक राहत नसल्याने ते असूनही नसल्यासारखे आहे.त्यामुळे पाण्यावाचून वणवण भडकावे लागत आहे. हेटवणे धरणातून पाईप लाईनद्वारे पाणी मिळावा यासाठी नागरिकांकडून मागणी होत आहे.

चिरनेर ग्रामपंचायत हद्दीमध्ये पाच वाड्या आहेत त्या मधील केलाचा माळ ही एक वाडी आहे. साधारणपणे ४५ कुटुंब या वाडी मध्ये वास्तव्य करीत आहेत. १७५ लोकसंख्या असून १२५ मतदान आहे. या वाडीसाठी जाण्यासाठी रस्ता मंजूर होऊनही पूर्णत्वास येत नाही त्यामुळे येथील नागरिकांना पायपीट करून जावे लागते पिण्याच्या पाण्यासाठी त्यांना वन वन भडकावे लागत आहे. बोरींग आहे तर त्याला पाणी नाही विहीर आहे. तर त्या विहिरीला पाणी पुरत नाही उन्हाळ्यात ट्रॅंकर द्वारे पाणी पुरवठा मागवावे लागत आहे. लाईट वाचून त्यांना चार - चार दिवस राहावे लागत आहे. पाणी लवकर मिळावा आणि रस्ता लवकर बनविण्यात यावा अशी येथील जनतेची मागणी आहे.

तसेच चिरनेर च्या चांदायली आदिवासी वाडीवर तर या पेक्षा भयानक परिस्थिती येथील जनता उदभवत आहे.३० कुटुंब येथे वास्तव्य करीत आहे.९० मतदान असलेल्या वाडीमध्ये स्वातंत्र्याच्या पचहत्तरी नंतर ही लाईट नाही. आजपर्यंत लाईतच नसल्याने येथील नागरीकांनी रहावे कसे असा प्रश्न पडत आहे. अनेक प्रश्न शिल्लक आहेत पाणी, शिक्षण रस्ते असे अनेक प्रश्न शिल्लक राहिले आहे. हाताला काम मिळत नसल्याने घरखर्च कसा चालवावा हा ही प्रश्न निर्माण होत आहे. उरणचा विकास झपाट्याने होत आहे. मात्र आदिवासी जनतेला या मूलभूत गर्जपासून वंचित राहावे लागत असल्याची मोठी शोकांतिका आहे. या आदिवासी ना जर स्वातंत्र्याचा पंचहत्तरीनंतरही पारतंत्र्यात राहावे लागत आहे.

# कोरोनाचे नियम न पाळल्यास कडक कारवाई : अश्वनाथ खेडकर

**दै.रायगड नगरी । माणगाव**

संपूर्ण देशभरात तसेच महाराष्ट्रात कोरोना ओमायक्रॉंन या आज-राचा प्रादुर्भाव हा वाढण्याची शक्यता असल्यामुळे या वर्षी देखील थर्टीफस्ट ही घरातच साजरी करण्यास भाग पडणार आहे. तसेच रायगड जिल्ह्यात माणगांव तालुक्यात देवकुंड, साजे, रवाळजे, विळा, या जंगलमय परिसरात मुंबई, पुणे, या शहरातील पर्यटकांची मोठी पसंती दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील मिळत असून मोठ्या प्रमाणात तंबुची ऑनलाईन बुक्कींग चालू असल्याची खात्रीशिर माहिती समजली आहे.तसेच माणगांव तालुक्यात थर्टीफस्ट बंदोबस्त विषय नियोजन कशाप्रकारे करण्यात आले आहे. या विषय माणगांव पो.नि.अश्वनाथ खेडकर यांना विचारले आसता त्यांनी बोलताना सांगितले की



गेल्या दोन वर्षापासून कोरोणा हा प्रादुर्भाव चालूच आहे.

तसेच आता परत ओमायक्रॉंन या आजाराचा प्रादुर्भाव महाराष्ट्रात काही भागात कमी प्रमाणात जरी असला तरी त्यांची दक्षता ही प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. अशाच प्रकारे ३१ डिसेंबर २०२१ रोजी माणगांव तालुक्यातील हॉंटेल, लॉंजीग, फार्म हाऊस, तसेच भिरा, पाटणूस मधील देवकुंड, विळा सिक्रेट प्लेस, साजे, रव-ाळजे, हा परिसर जंगल निसर्गमय असून या परिसरात राप्टींग होत असून नदिकाठी काही भागात फार्म हाऊस तसेच जंगलात काही तरूण मंडळी थर्टीफस्ट साठी पर्यटकांची ऑनलाईन बुक्कींग करून डीजे, देशी, विदेशी, दारूचे आयोजन करत असतात. या पार्ट्यांवर देखील माणगांव पोलिसांची यावेळी करडी नजर राहणार असून जर कुणी शासनाने लागू केलेले कोरोना ओमायक्रॉंन या प्रादुर्भाव विषय नियम न पाळल्यास ते पायदळी तुडवत असतील तर त्या व्यक्तीवर तसेच पार्ट्या आयोजकांवर कडक कारवाई केली जाईल असे माणगांवचे कर्तव्यदक्ष पो.नि.अश्वनाथ खेडकर यांनी बोलताना सांगितले.

# चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या मागण्या मान्य न झाल्यास पुन्हा तीव्र आमरण उपोषण



**दै.रायगड नगरी । उरण**

मौजे चाणजे ता.उरण येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत मोठ्या प्रमाणात शिरणारे समुद्राचे पाणी थांबविण्यासाठी द्रोणागिरी धारण तलाव क्र.२ वर असलेले साकवचे फ्लॅप गेट कायमस्वरूपी ठेवण्यासाठी तसेच करंजा टर्मिनल कंपनीकडून होत असलेली बेकायदेशीर जड वाहतूक थांबवण्यासाठी चाणजे शेतकरी संघर्ष समितीने अनेकवेळा मागणी केली त्यासाठी अनेक आंदोलने, उपोषणे, कायदेशीर पत्रव्यवहार केले पण शासन लक्ष देत नव्हते. शेवटी उरणचे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे व चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी यांनी बाधित स्थळाची प्रत्यक्ष पाहणी केली. नंतर तहसीलदार यांच्या विनंती नुसार बाधित शेतकरी व शासकीय अधिकारी यांची तहसीलदार कार्यालयात बैठक संपन्न झाली.

तहसीलदार कार्यालयामध्ये तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, पर्यावरण प्रेमी नंदकुमार पवार, सिडकोचे अधिकारी प्रमोद पाटील यांच्यासमोर चाणजे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अविनाश म्हात्रे व सदस्य निशिकांत म्हात्रे, कृष्णा पाटील, मंगेश म्हात्रे, अनिकेत ठाकूर, आमरण उपोषणकर्त्या हर्षला म्हात्रे व अन्य शेतकऱ्यांद्वारे मौजे चाणजे येथील शेतकऱ्यांच्या गंभीर समस्या मांडण्यात आल्या.

तहसीलदार कार्यालयामध्ये तहसीलदार भाऊसाहेब अंधारे, पर्यावरण प्रेमी नंदकुमार पवार, सिडकोचे अधिकारी प्रमोद पाटील यांना चाणजे शेतकरी संघर्ष समितीच्या शेतकऱ्याद्वारे येथील गंभीर समस्या मांडण्यात आल्या व जाब विचारण्यात आला. त्या अनुषंगाने लवकरात लवकर १००% फ्लॅप गेट लावण्यात यावे तसेच बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या करंजा टर्मिनलवर कायदेशीर कारवाई करावी अन्यथा स्थगित केलेले आमरण उपोषण तहसील कार्यालया समोर करण्यात येईल असे इशारा चाणजे शेतकरी संघर्ष समिती तर्फे प्रशासनाला देण्यात आले.

# पालीत वाहतूक कोंडीने कोंडमारा ; अवजड व डंपर वाहतुकीने कोंडी जटील

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात नाताळच्या सुट्ट्या व नववर्षाच्या स्वागतासाठी मोठ्या प्रमाणात भाविक व पर्यटक दाखल होत आहेत. भाविक व पर्यटकांची वाहने, तसेच इतर अवजड वाहने व डंपर यामुळे शहरात ठिकठिकाणी वाहतूक कोंडी जटिल होत आहे. दिवसा आणि रात्री देखील कोंडी होत असते. परिणामी पर्यटक, भाविक व नागरिक अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत.



पाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. परिणामी अनेक लोक कामानिमित्त व विद्यार्थी शाळा व कॉलेजमध्ये येत असतात. परिणामी कोंडीमुळे वाहनचालक, भाविक, पादचारी व विदयार्थ्यांची येथून वाट काढतांना मोठी गैरसोय होते. शिवाय दुर्घटना घडण्याची शक्यता देखील आहे. बल्लाळेश्वर मंदिर ते ग.बा. वडेर हायस्कूल, मारुती मंदिर चौक ते जुने एस.टी.स्टॅंड, गांधी चौक ते बाजारपेठ, कुंभारआळी, बॅंक ऑफ इंडिया, हटाळेश्वर चौक ते मिनिडोअर स्टॅंड, एसबीआय बॅंक ते गांधी चौक अशा अनेक ठिकाणी नियमित वाहतूक कोंडी होते.

पालीत खाजगी अवजड व लक्झरी वाहनांची नियमीत ये-जा सुरु असते. डंपर मोठ्या प्रमाणात येजा करतात.तसेच मोटार नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालक देखील वाहतूक कोंडीत भर घालतात. पालीतील रस्ते हे खूप अरूंद आहे. अशा अरुंद रस्त्याच्या दुतर्फा अनेकजण आपली दुचाकी व मोठी वाहने पार्क करतात व खरेदी किंवा इतर कामासाठी जातात. अनेक दुकाने, टपर्या व इमारती रस्त्याच्या अगदी कडेला आहेत. काही ठिकाणी तर अनधिकृत बांधकामे देखील बांधली गेली आहेत. याबरोबरच रस्त्याच्या बाजुला सुरु असलेली बांधकामे आणि या बांधकामाचे साहित्य रस्त्यावर पडलेले असते यामूळे येथून मार्ग काढणे वाहनचालकांना शक्य होत नाही. यामुळे देखिल पालीत सतत वाहतूक कोंडी होत असते. तसेच सुट्टयांच्या काळात तर मोठ्या प्रमाणात पर्यटक व भाविक पालीत दाखल होत आहेत. या वाहनांमुळे पालीतील वाहतुकीवर प्रचंड ताण येवुन वारंवार अनेक ठिकाणी वाहतुक कोंडी होत आहे.

मुंबई गोवा महामार्गाची दुरवस्था आणि वाहतुक कोंडी. त्यामुळे मुंबईवरून कोकणाकडे जाणारे प्रवासी पालीतून विळेमार्गे माणगाव वरुन किंवा वाकण वरून पुढे जातात. तर कोकणाकडून येणारी वाहने माणगाव वरुन विळे मार्गे पालीतून खोपोलीमार्गे पुणे-मुंबईकडे जातात. परिणामी पालीत वाहनांची रेलचेल वाढून अधिक वाहतूक कोंडी होते. बाह्यवळण मार्ग निर्माण झाल्यास हि वाहने पालीच्या बाहेरूनच निघून जातील त्यामुळे हि वाहतूक सुरळीत होऊ शकते.

राज्यशासनाने सन २०10 या वर्षी पाली बाह्यवळण मार्गाला मान्यता दिली आहे. तसेच रस्त्यास १८ कोटी तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळाली होती. सदरचा मार्ग हा वाकण पाली मार्गावरील बलाप येथून पाली पाटनुस राज्यमार्ग ९४ ला जोडला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगी एजन्सीद्वारे मार्गाचा प्लॅन फायनल केला आहे. त्यानुसार रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी त्यास मान्यता देवून प्रांत अधिकाऱ्यांना जमिन अधिग्रहणाच्या सुचना दिल्या होत्या. या मार्गालगत येणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी नष्ट होणार असल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. त्यांचा या मार्गाला विरोध आहे. परिणामी विविध कारणांमुळे मार्गाचे काम रखडले आहे. बाह्यवळण मार्ग झाल्यास येथील कोंडी फुटू शकेल.

# मर्चंट नेव्हीमध्ये नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या व्यावसायिकावर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मर्चंट नेव्हीमध्ये नोकरीला लावण्याचे आमिष दाखवून वसईतील एका तरुणाकडून ३ लाख ८० हजार रुपये उकळून त्याला नोकरीला न लावता उलट त्याला व त्याच्या वडिलांना मारहाण करणाऱ्या बेलापुर येथील रामराव काशीनाथ राठोड या व्यावसायीकाविरोधात वसई पोलिसांनी फसवणुकीसह मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. राठोड याने अशाच पद्धतीने अनेकांची फसवणुक केली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या प्रकरणातील तक्रारदार विनोद राठोड हा तरुण वसई येथे रहाण्यास असून दोन वर्षापुर्वी तो नवी मुंबईत उलवे येथे रहाण्यास होता, त्यावेळी होमटेक ग्रुप ऑफ कंपनीचा मालक रामराव काशीनाथ राठोड याच्याशी विनोद राठोड याची ओळख झाली होती. या ओळखीतून रामराव राठोड याने विनोद राठोड याला २ लाख रुपयांमध्ये मर्चंट नेव्ही मध्ये कामाला लावण्याचे अमिष दाखविले होते. रामराव राठोड याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून विनोद राठोड याच्या वडिलांनी रामराव राठोड याच्या बेलापुर सेक्टर-११ मधिल कार्यालयात जाऊन त्याला ३ लाख ५० हजार रुपये दिले होते. मात्र, त्यानंतर रामराव राठोड याने विनोदला मर्चंट नेव्ही मध्ये कामाला लावण्यास टाळाटाळ करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे विनोदने रामरावकडे नोकरीबाबत विचारपुस केली असता, त्याने गोस्वामी कुमार उर्फ गुलशान हा मर्चंट नेव्हीमध्ये मोठा अधिकारी असल्याचे सांगून त्याला ३० हजार रुपये देण्यास भाग पाडले होते. त्यानंतर या दोघांनी विनोदला मुलाखतीच्या बहाण्याने बेलापुर रेल्वे स्टेशनसमोरील कार्यालयात बोलावून त्याला कोर्सचे प्रमाणपत्र दिले होते. विनोदने सदर प्रमाणपत्राची शहानिशा केली असता, सदरचे प्रमाणपत्र हे बनावट असल्याचे आढळुन आले होते. त्यानंतर देखील रामराव व गुलशान या दोघांनी त्याच्याकडे आणखी ३ लाख रुपयांची मागणी केली होती. त्यामुळे विनोदने रामरावकडे आपली रक्कम परत मागण्यास सुरुवात केली असता, रामराव याने विनोद आणि त्याच्या वडिलांवर पोलिसात गुन्हा दाखल करण्याची तसेच त्यांना गायब करण्याची धमकी दिली होती. तसेच त्याच्या अंगरक्षकाने व चालकाने विनोद व त्याच्या वडिलांना मारहाण करुन धक्काबुक्की केली होती. त्यामुळे विनोद राठोड याने वसई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी रामराव राठोड व गोस्वामी कुमार या दोघांविरोधात फसवणुकीसह मारहाण करणे शिवीगाळ करणे अशा विविध कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे. रामराव राठोड याने आंबेजोगाई येथील शिवनेरी नागरी सहकारी पतसंस्थे मध्ये देखील कोट्यवधी रुपयांची अफरातफर केल्याचे उघडकीस आल्याने रामराव राठोड याच्या होम टेक, प्लॉटवाले, कोकण प्रॉपर्टी, नियरबाय प्लॉट अशा कंपन्याच्या माध्यमातून जमिनीत गुंतवणुक करणाऱ्यामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

# माथेरानच्या मुख्य रस्त्यावर पाणी मारण्यास सुरुवात ; मुख्याधिकारी सुरेखा भणगेंचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान मधील महात्मा गांधी हा मुख्य रस्ता पेव्हर ब्लॉक मध्ये बनविताना खासकरून घोडेवाल्यांच्या आग्रहास्तव मधोमध सहा फुटांचा रस्ता घोड्यांना चालण्यासाठी ठेवण्यात आला आहे. लाल मातीचा रस्ता असल्याने मोठया प्रमाणावर धुळीचा प्रादुर्भाव जाणवतो. काही वर्षांपूर्वी ईथे अग्निशमन दलाची गाडी नगरपरिषदेने आणलेली आहे तिचाही वापर झाला पाहिजे जेणेकरून त्या माध्यमातून ह्या मुख्य रस्त्यावर पाण्याचे शिंपण केल्यास आजूबाजूला असलेल्या व्यापारी दुकानदार यांच्या सामानाचे नुकसान होणार नाही. सोशल मीडियावर नेहमीच याबाबत माहिती दिली जात होती की सर्वाधिक महसूल हा व्यापारी वर्गाकडून दिला जातो परंतु आजवरच्या



काळात याकडे फारसे गांभीर्याने घेतले गेले नाही मागील वेळेस ही पद्धत गटनेते प्रसाद सावंत यांनी अंमलात आणली होती. त्यानंतर कोरोना मुळे सर्व व्यवहार बंद होते. सोशल मीडियावर आलेले संदेश पाहून नागरिकांना त्याचप्रमाणे पर्यटक व्यापारी लहान मोठे स्टॉल धारकांना धुळीचा त्रास उद्भवू नये यासाठी कार्यतत्पर मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या सूचनेनुसार या मार्गावर पाणी शिंपण सुरू केले आहे. त्यामुळे समस्त व्यापारी वर्गाकडून समाधान व्यक्त केले जात आहे.